(1)

# जिल्हाधिकारी कार्यालय वर्धा

## महसुल विभाग

### जाहीरात क्र.कक्ष-ब/आस्था-१/प्र.क. १० /२०१४/कावि ६०१/२०१४ दिनांक २० मे २०१४

महसुल व वनविभागाचे शासन निर्णय क्रमांक पदभरती २०१३/प्र.क्रं. १४७/ई १० दिनांक २६ फेब्रुवारी २०१४ तसेच मा. अप्पर मुख्य सचिव महसुल व वनविभाग यांचे पत्र क्रमांक संकीर्ण २०१३/प्र.क्रं. १४७/ई १०/दिनांक २९/४/२०१४ मधील निर्देशानुसार जिल्हाधिकारी कार्यालयाच्या तसेच सह जिल्हा उपनिबंधक कार्यालयाचे आस्थापनेवरील लिपीक टंकलखेखक,वाहन चालक, संवर्गातील रिक्त असलेली पदे सरळ सेवा नामनिर्देशनाने भरतीसाठी पात्र उमेदवारांकडुन लेखी (स्पर्धा) परिक्षेसाठी अर्ज दिनांक ३१ मे २०१४ पर्यंत ऑनलाईन (Online) पध्दतीने मागविण्यांत येत आहे. विहती तारखेनंतरचे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. लेखी परीक्षा दिनांक ०८ जुन २०१४ रोजी वर्धा मुख्यालयी, अंतर्गत तालुक्यामध्ये घेण्यांत येईल.

भरावयाच्या रिक्त पदांची माहिती

१) लिपीक टंकलेखक

वेतनबॅड - रुपये ५२००-२०२००/- ग्रेड पे-१९००/-

| महसुल विभाग | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ. क्र. | सामाजिक आरक्षणा नुसार | एकुण पदे | समातंर आरक्षण | | | | | | | |
| | | | महिला | माजी सैनिक | प्रकल्प ग्रस्त | भूकंप ग्रस्त | खेळाडू | अंश कालीन | अपंग | इतर |
| १ | अ.जा | ४ | १ | १ | १ | ० | १ | ० | ० | ० |
| २ | अ.ज. | ४ | २ | १ | ० | ० | ० | १ | ० | ० |
| ३ | वि जा अ | २ | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ४ | भज ब | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| ५ | भज क | ३ | १ | १ | ० | ० | ० | १ | ० | ० |
| ६ | इमाव | ९ | ३ | ३ | १ | ० | १ | १ | ० | ० |
| ७ | खुला | १३ | ४ | ३ | १ | ० | १ | २ | २ | ० |
| | एकूण | ३६ | १२ | १० | ३ | ० | ३ | ५ | २ | १ |

अंपग प्रवर्गात एकूण २ पदे भरावयाचे असून सामाजिक न्याय व विशेष सहाय्यता विभाग शासन निर्णय क्रमांक न्यायाप्र २००९/प्र.क्रं. ९/सुधार ३, दिनांक १३ ऑगस्ट २००९ अन्वये १ अंधत्व किंवा क्षिणदृष्टी (blindness or low vision) व १ श्रवण शक्तीतील दोष ( hearing impairment) अशी २ पदे राहतील त्याकरीता शासन निर्णयात नमुद केल्याप्रमाणे ४०% अंपगत्व असल्याबाबत सक्षम अधिकारी यांचे प्रमाणपत्र आवश्यक राहील. सदर दोन्ही पदे ही त्या-त्या प्रवर्गातून गुणवत्तेचे आधारे भरण्यांत येईल.

| सहजिल्हा निबंधक विभाग | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ. क्र. | सामाजिक आरक्षणा नुसार | एकुण पदे | समातंर आरक्षण | | | | | | | |
| | | | महिला | माजी सैनिक | प्रकल्प ग्रस्त | भूकंप ग्रस्त | खेळाडू | अंश कालीन | अपंग | इतर |
| १ | अ.जा | १ | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० |
| २ | वि.मा.प्र. | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० |
| ३ | इ.मा.व. | १ | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | ० |
| ४ | खुला | २ | ० | १ | १ | ० | ० | ० | ० | ० |
| | एकुण ५ | | ० | २ | १ | ० | १ | ० | १ | ० |

२) वाहन चालक
वेतनबॅड - रुपये ५२००-२०२००/- ग्रेड पे-१९००/-

| महसुल विभाग | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अ. क्र. | एकुण पदे ०२ | समातंर आरक्षण | | | | एकुण |
| | | महिला | माजी सैनिक | अंशकालीन | इतर | |
| १ | विजा अ | ० | ० | ० | १ | १ |
| २ | अ.ज. | ० | ० | ० | १ | १ |

२. लेखी परीक्षा रविवार दिनांक ०८ जुन २०१४ रोजी वर्धा येथे किंवा वर्धा जिल्हयातील तालुका मुख्यालयी घेण्यांत येईल. परीक्षेचे तारखेत बदल झाल्यास त्याबाबतच्या सुचना कार्यालयीन वेबसाईटवर प्रसिध्द करण्यांत येईल.

३. नियुक्त्या या रिक्त पदाच्या उपलब्धतेवर अवलंबून राहील. तसेच जाहिरातीमध्ये उल्लेख केलेल्या पदसंख्येत व आरक्षणात बदल होण्याची शक्यता आहे व बदल करण्याचे अधिकार अध्यक्ष जिल्हा निवड समिती यांना राहील.

४. उमेदवाराचे अर्ज ऑन लाईन (on line) पध्दतीने स्विकारण्यांत येणार असल्याने अर्ज करतांना शैक्षणीक पात्रतेची कागदपत्रे अन्य प्रमाणपत्रे जोडणे आवश्यक नाही. तथापी ऑन लाईन अर्जामध्ये पूर्ण माहिती भरणे आवश्यक आहे. ऑन लाईन पध्दतीने अर्ज भरतांना काही त्रृटी राहील्यास व अर्ज नाकारला गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी उमेदवाराची राहील. याबाबत उमेदवारास तक्रार करता येणार नाही.

५. उमेदवाराची लेखी परिक्षा हि उमेदवाराची कोणतीही कागदपत्रे पूर्व तपासणी न करता घेतली जाणार असल्याने कागदपत्राच्या तपासणीत उमेदवारांची कागदपत्रे खोटी/अवैध आढळल्यास उमेदवाराची निवड रद्द केली जाईल.

६. <u>वयोमर्यादा</u>

१. उमेदवाराचे वय जाहीरातीचे दिनांकास किमान १८ वर्षापेक्षा कमी व ३३ वर्षापेक्षा जास्त नसावे. मागासवर्गीयासाठी ३८ वर्षापेक्षा जास्त नसावे.

२. माजी सैनिक प्रवर्गातुन अर्ज करणाऱ्या माजी सैनिक अर्जदारासाठी शासन सामान्य प्रशासन विभागाकडील शुध्दीपत्रक दिनांक २०.८.२०१० अन्वये माजी सैनिकांसाठी शासन सेवेतील वर्ग ३ व वर्ग ४ मधील पदांसाठी नेमणुकीकरीता विहीत वयोमर्यादेतील सुट ही सदर उमेदवाराच्या सशस्त्र दलात झालेल्या सेवेइतका कालावधी अधिक ३ वर्षे इतकी राहील.

३. प्रकल्पग्रस्त/भुकंपग्रस्त व अपंग उमेदवारांसाठी जाहिरातीचे दिनांकास वयाची १८ वर्षे पूर्ण झालेली असणे आवश्यक आहे. तसेच त्याचे कमाल वय ४५ वर्षापेक्षा जास्त नसावे.

४. पदविधर/पदविकाधारक अंशकालीन उमेदवारासाठी अर्जदाराचे वय जाहिरातीचे दिनांकास किमान १८ पेक्षा कमी नसावे व कमाल वय ४६ वर्षापेक्षा जास्त नसावे. तसेच अंशकालीन उमेदवारास शासन निर्णय दिनांक २७.१०.२००९ अन्वये देऊ केलेले समांतर आरक्षण हे त्यास शासकिय नोकरी मिळवण्यास साहयभूत ठरावे हया उद्देशाने दिलेले आहे. उमेदवारांनी एकदा समांतर आरक्षणाचा लाभ घेतला आहे त्याच उमेदवारास पुन्हा समांतर आरक्षणाचा लाभ घेता येणार नाही.

५. खेळाडूसाठी खेळाडूची गुणवत्ता व पात्रता विचारात घेवून सदर पदासाठी असलेल्या उच्चतम वयोमर्यादेत पाच वर्षापर्यंत वयाची अट शिथील करण्यात येईल.

६. सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय दिनांक ६.१०.२०१० अन्वये अर्ज करणा-या स्वातंत्र संग्राम सैनिकाचे नामनिर्देशीत पाल्य व १९९१ चे जनगणना कर्मचा-यासाठी अर्जदाराचे वय १८ वर्षे पुर्ण असावे व वय ४५ वर्षे पेक्षा जास्त नसावे.

७. अपंगासाठी कमाल वयोमर्यादा ४५ वर्षे इतकी राहील.

**७) किमान शैक्षणिक अर्हता :-**

अ) लिपीक टंकलेखक अर्हता :-

१.अर्जदाराने संविधानिक माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा (एस.एस.सी.) वा तत्सम मान्यताप्राप्त शिक्षण मंडळाची परीक्षा उतीर्ण असणे आवश्यक आहे.

२.अर्जदाराने लिपीक पदासाठी महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाचे मराठी ३० श.प्र.मि. किंवा इंग्रजी ४० श.प्र.मि. टंकलेखनाची अर्हता जाहिरातीचे दिनांका पूर्वी धारण करणे आवश्यक आहे.

३.महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रं. प्रशिक्षण २०००/प्र.क्रं. ६१/२००१/३९/ दिनांक १९ मार्च २००३ मधील सुचनेनुसार नियुक्त होणा-या सर्व कर्मचा-यांना संगणक अर्हता खाली नमुद केलेले प्रमाणपत्र त्यांच्या नियुक्तीच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या आंत प्राप्त करणे आवश्यक राहील अन्यथा त्यांची सेवा समाप्त करण्यांत येईल.

* D.O.E.A.C.C. सोसायटीच्या अधिकृत C.C.C. किंवा O स्तर किंवा A स्तर किंवा B स्तर किंवा C स्तर किंवा पैकी कोणतीही एक परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र.

* महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाकडून घेण्यांत येणारी MS-CIT परीक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र.

४. माध्यमिक शालांन्त परिक्षेत मराठी / हिंदी विषयाचा समावेश नसल्यास निवड झालेल्या उमेदवारांना एतदर्थ मंडळाचे मराठी / हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

**ब) वाहन चालक अर्हता :-**

१. अर्जदार हा इयत्ता ४ थी उतीर्ण असणे आवश्यक आहे.

२.अर्जदाराने मोटार कार/जीप/जड वाहना चालविण्यांचा परवाना असणे आवश्यक आहे.

३.अर्जदारास मराठी व हिंदी भाषा लिहता,वाचता व बोलता आली पाहिजे.

४.अर्जदारास वाहन चालविण्यांचा ३ वर्षाचा अनूभव असणे आवश्यक आहे.

५.अर्जदारास मोटार मेकॅनिझम व सबंधित प्रादेशिक विभागाच्या भौगौलिक परिस्थितीचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

६.वाहन दुरुस्तीचे जुजबी ज्ञान असणे आवश्यक आहे.

९. परिक्षेचे स्वरुप.

| अ.क्रं. | संवर्ग | परीक्षेसाठी गुण | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | लेखी परीक्षा | मौखिक परीक्षा | चाचणी / व्यवसायिक चाचणी परीक्षा | एकुण गुण |
| १. | लिपीक टंकलेखक | २०० | -- | -- | २०० |
| २. | वाहन चालक | --- | १० | ९० | १०० |

सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय दिनांक १९.१०.२००७ नुसार लिपीक टंकलेखक पदाकरीता २०० गुणांची लेखी परीक्षा घेण्यांत येईल. परीक्षेला मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान व बौध्दीक चाचणी या विषयावर प्रत्येकी ५० गुण या प्रमाणे प्रश्नपत्रिकेचे स्वरुप राहील. मुलाखत न घेता लेखी परीक्षेत मिळालेले गुणांचे आधारे निवड करण्यांत येईल. मुळ कागदपत्रे तपासणी नंतरच नियुक्ती आदेश निर्गमित करण्यांत येईल.

लेखी परीक्षेत किमान ४५% गुण प्राप्त करणे आवश्यक राहील.

ज्या उमेदवारास समान गुण असतील अशा उमेदवारांचा गुणवत्ता क्रम हा शासन निर्णय दिनांक २७ जुन २००८ मधील तरतुदीनुसार / निकषानुसार क्रमवार लावला जाईल.

उमेदवाराने लेखी परीक्षेसाठी तसेच वाहन चालक पदाकरीता मुलाखतीसाठी नियोजीत परीक्षा केन्द्रावर स्वखर्चाने हजर राहावे लागेल.

१०. परीक्षा शुल्क :-

प्रस्तूत भरती प्रक्रीयेसाठी खालील प्रमाणे परीक्षा शुल्क राहील.

| मागासवर्गीय उमेदवाराकरीता | खुल्या प्रवर्गातील उमेदवाराकरीता |
|---|---|
| १५० | ३०० |

वरील प्रमाणे परीक्षा शुल्क हे नापरतावा राहील. परीक्षा शुल्क जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा निवड समिती वर्धा यांचे नावाने बॅक ऑफ इंडिया खाते क्रमांक ९७२०२०११००००११२ मध्ये चलान व्दारे बॅकेत भरावे.

भरती प्रक्रीये अंतर्गत अर्ज करण्यासाठी शुल्क चलान Bank Of India च्या कोणत्याही शाखेत भरता येईल. याकरीता उमेदवारास www.wardha.nic.in तसेच http://wardhadistrict.govrecruitment.in या संकेतस्थळावर माहिती भरुन रजिस्ट्रेशन करुन चलानच्या तीन प्रतिची प्रिन्ट Print घेता येईल. या संकेतस्थळावरुन तयार झालेले चलान उमेदवाराने बॅक ऑफ इंडियाच्या शाखेत (Bank Of India) भरण्यासाठी वापरावे. सदर बॅकेत हे चालान भरल्यानंतर या बॅकेचा Journal No. तयार होतो, जो की उमेदवाराच्या चलान पोचपावतीवर बॅकेमार्फत लिहून देण्यांत येतो. Journal No. टाकल्याशिवाय उमेदवाराचा अर्ज पूर्ण होत नाही त्यामुळे फक्त Bank Of India यांच्याच शाखेतून हे चालान भरण्यांत यावे. या Journal No ची बॅकेत भरलेल्या प्रत्येक रक्कमेच्या Journal No शी पडताळणी केली जाईल. ज्या उमेदवारांचे Journal No बॅकेशी जुळतील अशा उमेदवारांनाच पात्र करण्यांत येईल.

**शुल्कासंबधी विषेश सुचना :-** वरील ऑनलाईन शुल्का व्यतिरिक्त डी.डी. (धनाकर्ष) /धनादेश/इंडियन पोस्टल ऑडर इ. कोणत्याही माध्यमाव्दारे शुल्क स्विकारले जाणार नाही. फक्त ऑन लाईन Bank Of India बॅकेत विहीत चलानव्दारे भरणा केलेले शुल्कच ग्राहय धरण्यांत येईल. इतर बॅके मार्फत भरलेले चलान Journal No मध्ये टाकल्यास पडताळणी करते वेळेस सदर उमेदवारास अपात्र करण्यांत येईल. व त्याबाबत उमेदवाराची कोणतिही तक्रार अथवा आक्षेप ऐकून घेतले जाणार नाही.

**माजी सैनिकांना अर्जासोबत आवेदन शुल्क भरण्याची अट लागु नाही. परंतु अर्जात माजी सैनिक असा उल्लेख असणे आवश्यक आहे. कागदपत्रे तपासणीचे वेळी उमेदवार माजी सैनिक नसल्याचे आढळुन आल्यास अर्ज रद्द समजण्यांत येईल.**

टिप :-विमूक्त जाती,भटक्या जमाती,विशेष मागास प्रवर्ग,इतर मागास प्रवर्ग या प्रवर्गातील जे उमेदवार उन्नत व प्रगत गटात (क्रीमीलीअर) मोडतात त्यांना आरक्षणाचा व वयोमर्यादेचा फायदा मिळत नसल्याने त्यांनी खुल्या उमेदवाराप्रमाणे परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.

(२) खुला महिलासाठी आरक्षित असलेल्या पदाकरीता अर्ज करणा-या विमुक्त जाती,भटक्या जमाती,विशेष मागास प्रवर्ग,इतर मागास प्रवर्ग मधील महिला उमेदवारापैकी जे उमेदवार उन्नत व प्रगत गटात (क्रीमीलीअर) मोडतात त्यांना आरक्षणाचा व वयोमर्यादेचा फायदा मिळत नसल्याने त्यांनी खुल्या उमेदवाराप्रमाणे परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.

११. <u>अर्ज कसा करावा</u> :- जाहीरात काळजीपुर्वक वाचावी. उमेदवाराची माहिती संगणकावर एकत्रित करण्यांत येणार आहे. परिक्षेसाठी विहीत केलेला अर्ज www.wardha.nic.in तसेच http://wardhadistrict.govrecruitment.in या संकेत स्थळावर उपलब्ध होईल. त्यावर संपर्काकरीता E-Mail ID तयार करणे त्यांनतर संपूर्ण नाव, जन्म दिनांक, जात, इ. माहिती भरल्यानंतर Login ID व Password जनरेट होईल तो सांभाळून ठेवणे त्याचबरोबर चलान जनरेट होईल सदर चलान प्रिन्ट आऊट काढून चलान बॅकेत भरुन Journal No. प्राप्त करुन घ्यावा. त्यानंतर आपला Login Id टाकल्यानंतर Journal No. टाकणे आवश्यक राहील. त्यानंतर संपूर्ण अर्ज भरावा. संपूर्ण अर्ज भरुन झाल्यानंतर फोटो अपलोड या बटनवर क्लीक करावे व स्कॅन केलेले स्वत:चे अद्यावत सुस्पष्ट ३.५ से.मि. X ४.५ से.मि. आकारातील JPG/JPEG/BMP या प्रकारचे व १५० KB पर्यत फाईल

साईज असलेले छायाचित्र अपलोड करावे (छायाचित्राचा फाईल साईज १५० KB पेक्षा जास्त नसावा त्यापेक्षा मोठी फाईल अपलोड होणार नाही ) यानंतर Finish बटनवर क्लीक करावे व संपूर्ण अर्जाची प्रिन्ट आऊट घ्यावी सदर अर्जाची प्रिन्ट आऊट व चलानची प्रत स्वत: जवळ सांभाळून ठेवावी.

१२. परिक्षा प्रवेश पत्र उमेदवारांस www.wardha.nic.in तसेच http://wardhadistrict.govrecruitment.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. पदभरती संदर्भात विस्तृत सविस्तर माहिती, इतर शर्ती व अटी हया www.wardha.nic.in तसेच http://wardhadistrict.govrecruitment.in या संकेतस्थळावर उपलब्ध राहील. संकेतस्थळावर प्रशिध्द करण्यात आलेली संपूर्ण जाहीराती मधील सुचनाचे वाचन करुनच अर्ज सादर करावे.

१३. नॉनक्रीमीलीअर प्रमाणपत्र नजिकच्या काळात काढलेले असावे. (विमूक्त जाती व भटक्या जमाती/विशेष मागास प्रवर्ग/इतर मागास प्रवर्ग करीता आवश्यक) (सदर प्रमाणपत्र दिनांक ३१ मार्च २०१४ च्या आर्थिक वर्षा पर्यंत वैध असणे आवश्यक आहे) वैध प्रमाणपत्र नसलेल्या उमेदवाराचा विचार केल्या जाणार नाही व अशा उमेदवाराना राखीव संवर्गाचा लाभ घेता येणार नाही. जर उमेदवाराने खुल्या प्रवर्गाचे परिक्षा शुल्क धनादेशाव्दारे भरले असेल तर त्यांचा अर्ज खुल्या प्रवर्गासाठी ग्राहय धरण्यांत येईल.

१४. अपंग/भुकंपग्रस्त/प्रकल्पग्रस्त/माजी सैनिक/अंशकालीन बेरोजगार कर्मचारी/१९९१ चे जनगणना कम्रचारी/स्वांतत्र्य संग्राम सैनिकाचे पाल्य बाबतचा दाखला आवश्यक राहील.

१५. अनुभव प्रमाणपत्र (मोघम नको) संस्थेचा शिक्का व सही तसेच जावक क्रमांक असणे आवश्यक.

१६. खेळाडू उमेदवारासंबधी महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण विभाग व क्रिडा विभाग निर्णय क्रमांक रा.क्रि.घो. २००२/प्र.क्रं. ६८/क्रि.ये.से. २/दिनांक ३० एप्रिल २००५ नुसार पात्र खेळाडू उमेदवार असणे आवश्यक आहे. खेळाडूसाठी आरक्षणाच्या पदाकरीता खेळाडूंनी राज्य अजिंक्यपद स्पर्धा मध्ये भाग घेतला आहे आणि उक्त शासन निर्णया मध्ये नमुद केल्यानुसार पारितोषिके प्राप्त केली आहेत अशाच उमेदवारांनी अर्ज करावा. उमेदवारांनी शासन निर्णयानुसार अर्जासोबत आवश्यक प्रमाणपत्र नमुना १ ते ४ मध्ये साक्षांकित प्रत व मुळ प्रमाणपत्र अंतीम निवडीच्या वेळी सादर करणे बंधनकारक आहे. **प्रमाणपत्र संचालक, क्रिडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य पुणे यांचेकडून पडताळणी झालेनंतरच नियुक्ती देण्यांत येईल.**

१७. शासकीय/निमशासकीय कर्मचारी असल्यांस सक्षम प्राधिका-यांची मंजूरी घेतल्याचे प्रमाणपत्र आवश्यक राहील. अर्जात विभाग प्रमुखांनी दिलेल्या परवानगीचा क्रमांक नमुद करणे आवश्यक आहे.

१८. सेवा योजन कार्यालयात नांव नोंदणी केल्याचे प्रमाणपत्र. अंशकालीन उमेदवारांना सेवा योजन कार्यालयात नोंदणी केल्याचे विहीत प्रमाणपत्र आवश्यक राहील.

१९. उमेदवार हा महाराष्ट्रातील मूळ रहिवासी असावा.उमेदवारास मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असल्याचे (डोमिसीअल) प्रमाणपत्र प्राधिकृत अधिका-याकडून घेतलेले असावे. डोमिसिअल प्रमाणपत्र नसल्यास महाराष्ट्रातील जन्माचा दाखला सादर करणे बंधनकारक राहील.

२०. महाराष्ट्र राज्य लोकसेवा (अनुसूचित,अनुसूचीत जमाती,निरधीसूचित जमाती,भटक्या जमाती,विशेष मागास प्रवर्ग,इतर मागास प्रवर्ग यांच्यासाठी आरक्षण)अधिनियम २००१ (सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८)मधील तरतुदीनुसार उन्नत व प्रगत गटाचे (क्रिमीलीअर)तत्व विमूक्त जाती,भटक्या जमाती,विश्ेष मागास प्रवर्ग,इतर मागास प्रवर्ग या प्रवर्गाला लागू केले आहे.

२१. महिला आरक्षणासाठी खुल्या प्रवर्गातील महिलानी उन्नत व प्रगत गटाचे (क्रिमीलीअर) मध्ये मोडत नसल्याचे (नॉन क्रिमीलीअर) प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे तसेच विमूक्त जाती,भटक्या जमाती,विशेष मागास प्रवर्ग,इतर मागास प्रवर्ग, या सर्व प्रवर्गाला उननत व प्रगत गटाचे ( क्रिमीलीअर) या मध्ये मोडत नसल्याचे नॉन क्रिमीलीअर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

२२. खुल्याप्रवर्गातील उन्नत व प्रगत व्यक्ती/कुटूंबातील (क्रिमीलेअर) खेळाडू सदस्यांना खेळाडूसाठी असलेले आरक्षण अनूज्ञेय नाही.तसेच विमूक्त जाती,भटक्या जमाती,विशेष मागास प्रवर्ग,इतर मागास प्रवर्ग, या सर्व प्रवर्गाला उननत व प्रगत गटाचे (क्रिमीलीअर)तत्व लागू असल्याने या प्रवर्गातील उन्नत व प्रगत व्यक्ती अथवा गटातील खेळाडू सदस्यांना खेळाडूचे आरक्षण अनूज्ञेय राहणार नाही त्यांनी उन्नत व प्रगत व्यक्ती गट (क्रिमीलेअर) मध्ये मोडत नसल्याचे नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

२३. विमूक्त जाती, ,भटक्या जमाती,विशेष मागास प्रवर्ग,इतर मागास प्रवर्ग या प्रवर्गाला उन्नत व प्रगत गटाचे (क्रिमीलेअर)बाबत सामाजिक न्याय विभागाने वेळोवेळी निचिश्त केलेले नियम व अटी लागू राहतील.

२४. सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्रमांक एसआरव्ही-२००/प्र.क्र.१७/२०००/१२ दिनांक १ जुलै २००५ नुसार लहान कुटूंब असल्याचे प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक राहील.

२५. एकुण पदाच्या संख्येत घट किंवा वाढ करण्यांचे अधिकार जिल्हा निवड समितीने राखुन ठेवलेले आहेत

२६. जाहीरातीत किंवा जाहिरातीच्या काही भागात अंशत: बदल वा संपूर्ण जाहीरात रद्द करण्यांचे अधिकार जिल्हा निवड समितीने स्वत:कडे राखून ठेवला आहे.याबाबतचा निर्णय कोणत्याही प्रकारे उमेदवारास कळविल्या जाणार नाही,याबाबत उमेदवाराला आव्हान करता येणार नाही वा देता येणार नाही.

२७. कोणताही अर्ज करणारा उमेदवार विहीत शैक्षणीक अर्हता,पात्रता धारण करीत नसल्याचे किंवा त्यांचे चारित्र्य व पूर्व चारित्र्य बरोबर नसल्याचे आढळल्यांस त्यांची उमेदवारी/नियूक्ती कोणत्याही टप्यावर रद्द करण्यांत येईल.

२८. कोणत्याही उमेदवाराने निवड प्रक्रीया सुरु झाल्यानंतर त्यांनी केलेल्या अर्जात दिलेली माहिती व अर्जासोबत जोडलेली प्रमाणपत्रे आणि निवड झाल्या नंतर शिफारस/नियूक्ती करण्यांच्या वेळेस सादर केलेली सर्व मूळ प्रमाणपत्रे व इतर आवश्यक प्रमाणपत्रे खोटी/अवैध सादर केल्याचे निदर्शनास आल्यांस

त्या सबंधित उमेदवाराचा अर्ज व झालेली निवड/नियूक्ती कोणत्याही टप्यावर रद्द करण्यांत येवून फौजदारी स्वंरुपाचा गुन्हा नोंदविण्यांत येईल.

२९. मागास वर्गीय उमेदवाराची राखीव जागेतून अंतीम निवड झाल्यानंतर महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन शासनि निर्णय क्रमांक बीसीसी २०११/प्र.क्रं. १०६४/२०११ १६ ब दिनांक १२.१२.२०११ अन्वये सबंधीत उमेदवारांच्या जात वैधता प्रमाणपत्राचे अधिन राहून जात वैधता प्रमाणपत्र सहा महिने कालावधीचे आत सादर करण्याचे अटीवर बंधपत्र/शपथपत्र लिहून दिल्यानंतर विहीत मुदतीत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील. शासन निर्णयाच्या अधिन राहून तात्पूरती नियूक्ती दिली जाईल विहीत मुदतीत जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास त्यांची सेवा संपूष्ठात आणण्यांत येउन नियमानुसार कार्यवाही करण्यांत येईल.

३०. कोणत्याही अर्ज करणा-या उमेदवाराने पद भरती प्रक्रीयेत प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष हस्तक्षेप करण्यांचा प्रयत्न केल्यांस वा कोणत्याही प्रकारचा राजकीय दबाव आणल्यांस त्यास निवड प्रक्रीयेतून बाद करण्यांत येईल.

३१. शासन सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय क्रमांक आरटीए/१०९०/२२ प्र.क्रं. ६/९३/१२ दिनांक ८.६.१९९३ मधील तरतुदीनुसार माजी सैनिक उमेदवाराने माजी सैनिक या संमातर घटकाच्या आरक्षणाचा पुर्वी लाभ घेऊन शासकिय सेवेत नोकरी स्विकारली असेल तर तो पुन्हा समांतर आरक्षणाच्या लाभास पात्र राहणार नाही केवळ वयाची सवलत घेण्यास तो पात्र राहील.

३२. मागासवर्गीय उमेदवारांची खुल्या प्रवर्गात निवड झाल्यास शासन सामान्य प्रशासन विभागाचे निर्णय दिनांक १६ मे २००७ अन्वये शासन सेवेतील पुढील सवलती करीता ते ज्या प्रवर्गाचे आहेत त्या प्रवर्गाचे जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

३३. पदवीधर अंशकालीन उमेदवारांचे बाबतीत त्यांना समांतर आरक्षणाचा लाभ सामान्य प्रशासन विभागाची परिपत्रक दिनांक ६.८.२०१० अन्वये एकदाच लागू राहील त्यामुळे यापुर्वी अंशकालीन म्हणून समांतर आरक्षणाचा लाभ घेतलेल्या उमेदवारांना पुन्हा सदर लाभ लागू राहणार नाही.

३४. लिपीक पदासाठी लेखी परीक्षेतील प्राप्त गुणाचे आधारे गुणवत्तेनुसार अंतीम निवडीसाठी उमेदवारांना त्यांची सर्व मुळ कागदपत्रे तपासणीसाठी उपलब्ध करून दयावी लागतील. अन्यथा अंतीम निवडीसाठी विचार केला जाणार नाही.

३५. निवड प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर ६० दिवसाचे कालावधी नंतर प्रश्नपत्रिका व उत्तरपत्रिका नष्ट केल्या जातील.

३६. Online Form भरण्याची शेवटचा दिनांक ३१ मे २०१४ राहील. दिलेल्या तारखेनंतर संकेतस्थळावरुन अर्ज भरण्याची प्रक्रीया काढून टाकण्यांत येईल / बंद करण्यांत येईल. अर्ज फक्त Online पध्दतीनेच स्विकारले जातील कार्यालयात प्रत्यक्ष स्वरुपात कोणतेही अर्ज स्विकारण्यात येणार नाही.

३७. प्रस्तूत भरती प्रक्रियेच्या अनुषंगाने वेळोवेळी शासनाकडून प्राप्त होणा-या सुचनेप्रमाणे कार्यवाही करण्यांत येईल. तसेच सदरील प्रक्रियेत काही बाबी हया नमुद करावयाच्या राहिल्यास किंवा अनावधानाने चुकिच्या नमुद केलेल्या असल्यास त्या प्रचलित शासन निर्देशानुसार / निर्णयाप्रमाणे लागू राहतील.

३८. अर्ज भरण्यासंबधी, हॉल टिकीट (परीक्षा प्रवेशपत्र) उपलब्धतेसाठी इ. तत्सम बाबीसाठी वरील संकेतस्थळावर संर्पक करावा. त्याचप्रमाणे चलान भरण्यास काही अडचण असल्यास ०७१५२/ २४३६८८ या क्रमांकावर संपर्क साधावा.

३९. लिपीक, वाहन चालक, शिपाई संवर्गातील पदाकरीता निवड करतांना महसुल विभाग व सह जिल्हा उपनिबंधक विभाग या मध्ये कोणत्या उमेदवारास कोणता विभाग दयावयाचा याबाबतचे अधिकार अध्यक्ष जिल्हा निवड समिती तथा जिल्हाधिकारी वर्धा यांनी राखून ठेवले आहेत. त्याबाबत उमेदवारास कोणताही दावा करता येणार नाही.

40. सामाजिक न्याय व विशेष सहाय्यता विभाग शासन निर्णय क्रमांक न्यायाप्र २००९/प्र.क्रं. ९/सुधार ३, दिनांक १३ ऑगस्ट २००९ अन्वये १ अंधत्व किंवा क्षिणदृष्टी (blindness or low vision) व १ श्रवण शक्तीतील दोष ( hearing impairment) अशी २ पदे राहतील त्याकरीता शासन निर्णयात नमुद केल्याप्रमाणे ४०% अंपगत्व असल्याबाबत सक्षम अधिकारी यांचे प्रमाणपत्र आवश्यक राहील.

**<u>इतर सुचना</u>**

१ उमेदवाराने अर्ज केला अथवा विहीत अर्हता धारण केली म्हणजे परीक्षेला बोलविणेचा हक्क अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही.

२. अर्जदाराने कागदपत्रे तपासणीचे वेळी शाळा सोडल्याचा दाखला,जन्माचा दाखला, शैक्षणिक अर्हतेबाबत गुणपत्रिका,जातीचा दाखला,नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र (३१.३.२०१४ पर्यत वैध असणे आवश्यक), जात वैधता प्रमाणपत्र, अधिवास प्रमाणपत्र, शासकिय/निमशासकिय कर्मचारी असल्यास सक्षम प्राधिका-यांची मंजुरी घेतल्याचे प्रमाणपत्र, इतर आवश्यक कागदपत्रे तपासणीचे वेळी सादर करणे बंधनकारक राहील.

३. निवड झाल्यानंतर शिफारस/ नियुक्ती करण्यांच्या वेळी सर्व मूळ प्रमाणपत्रे व इतर आवश्यक प्रमाणपत्रे उमेदवाराने तपासणीचे वेळी सादर करणे आवश्यक राहील.दिलेली प्रमाणपत्रे खोटी/अवैध असल्यांस उमेदवार फौजदारी कार्यवाहीस पात्र राहील.

४.विहीत वयोमर्यादेतील शासकीय/निमशासकीय कर्मचा-यांनी त्यांचे अर्ज सक्षम प्राधिका-या मार्फत पुर्व परवानगीने भरावेत.

५.अंशकालीन कर्मचारी उमेदवारानी त्यांच्या अनुभवाची सेवायोजन कार्यालयाकडे नोंदणी केल्याचे वैध पुरावे द्यावे/माजी सैनिक उमेदवाराने जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयातील नांव नोदंणी केल्याचे वैध प्रमाणपत्र सादर करावे. अंशकालीन व माजी सैनिक उमेदवारांना समांतर आरक्षणाचा लाभ एकदा घेतला असल्यास पुन्हा लागू राहणार नाही.

६.सन १९९१ च्या कार्यमूक्त जनगणना कर्मचारी उमेदवारानी जनगणना कार्यालयातील सेवेचा कालावधीचे प्रमाणपत्र व प्रादेशिक संचालक तथा सहाय्यक संचालक रोजगार व स्वंयरोजगार कार्यालयात सन १९९१ च्या कार्यमूक्त जनगणना कर्मचारी म्हणून नांव नोंदणी केल्याचे वैध प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

७.जिल्हा रोजगार व स्वंयरोजगार कार्यालयात नांव नोंदणी केली असल्यांस ते वैध प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

८. अंपग प्रवर्गाकरीता ४०% अंपगत्वाचे सक्षम प्राधिकारी यांचे प्रमाणपत्र बंधनकारक राहील.

दिनांक २० मे २०१४

सदस्य सचिव
जिल्हा निवड समिती
तथा निवासी उपजिल्हाधिकारी वर्धा

स्वाक्षरीत/-
अध्यक्ष
जिल्हा निवड समिती
तथा जिल्हाधिकारी वर्धा